प्रेस नोट

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र. १ विलास साहेबराव खेडेकर वय ५२ वर्ष पद मंडळ अधिकारी रा. गजानन कॉलनी खामगांव<br>आलोसे क्र. २ बाबुराव उकर्डा मोरे वय ३६ वर्ष पद तलाठी रा. किन्ही महादेव ता. खामगांव जि. बुलडाणा |
| लाच मागणी | दारु व मटन पार्टी |
| लाच स्विकारले | दारु व मटन पार्टी |
| घटनास्थळ | प्रिंप्री धनगर शिवारातील प्रल्हाद गणु चव्हाण यांचे शेतातील झोपडीसमोर |
| घटना तारीख | २८.०५.२०२१ |

थोडक्यात हकीकत :— यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की त्यांचे भावाच्या नांवे खरेदी केलेल्या प्लॉटची नोंद घेवुन फेरफार नक्कल देण्याकरिता लोकसेवक क्र १श्री. खेडेकर, मंडळ अधिकारी,लाखनवाडा/शिर्ला नेमाणे व लोकसेवक क्र. २ श्री.मोरे तलाठी, शिर्ला नेमाणे यांनी प्लॉटचे सातब—यावर नोंद घेवुन फेरफार नक्कल देण्यासाठी प्रत्येकी पाच हजार रुपये प्रमाणे दोघांचे दहा हजार रुपये, दारु व मटन पार्टी मागणी करुन त्यापैकी दोघांचे दहा हजार रुपये पाच दिवसापुर्वी स्विकारली व तक्रारदार यांना आय बी च्या दोन क्वॉर्टर व मटण पार्टीच्या स्वरुपात लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. त्यानुसार लाचेच्या मागणी बाबत तक्रारदार व पंच क्र. १ यांचेसह लोकसेवक क्र १श्री. खेडेकर, मंडळ अधिकारी,लाखनवाडा/शिर्ला नेमाणे व लोकसेवक क्र. २ श्री.मोरे तलाठी, शिर्ला नेमाणे हे दारु व मटन पार्टीची पडताळणी दरम्यान मागणी केल्याने दिनांक २८.०५.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक क्र १श्री. खेडेकर, मंडळ अधिकारी,लाखनवाडा/शिर्ला नेमाणे व लोकसेवक क्र. २ श्री.मोरे तलाठी, शिर्ला नेमाणे यांनी घटनास्थळी पंच क्र. १ यांचे समक्ष आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन, दारु व मटनाच्या मेजवानीच्या स्वरुपात अनुचित लाभ मिळवुन, लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने आलोसे यांचे विरुध्द पोस्टे हिवरखेड अप.नं. १९६/२०२१ कलम ७ लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफयांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner